# अधिसूचना
## जिल्हाधिकारी, यांचेकडून
## भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम 2013

**क्रमांक :- 2019/भूसंपादन/जिप/कार्या-1/एस.आर.24/2007/आरआर-**

दिनांक. /10/2019

ज्याअर्थी, भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, 2013 (2013 चा 30) याच्या कलम 3 च्या खंड (इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्र.संकिर्ण11/2014/प्र.क्र.77/अ-2, दिनांक 19 जानेवारी, 2015 (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त अधिसूचना" असा करण्यात आला आहे) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम 3 च्या खंड (झेड ओ) मध्ये व्याख्या केलेल्या एखादया सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखादया जिल्हयातील 500 हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरीता जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्हयाचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या सोलापूर जिल्हयाच्या जिल्हाधिकाऱ्यांस यासोबत जोडलेल्या अनुसची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त जमीन" असा करण्यात आला आहे) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त "सार्वजनिक प्रयोजन" असा करण्यात आला आहे) आवश्यक आहे अथवा तिची आवयकता भासण्याची शक्यता आहे, असे वाटते, ज्याच्या स्वरुपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची दोनमध्ये दिलेले आहे, आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम 11 च्या पोट कलम (1) च्या तरतुदींन्वये याद्वारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमि संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची तीन मध्ये दिलेली आहेत. (विस्थापन होणार असेल तर या अनुसूचीमध्ये कारणे नमूद करावीत.)

आणि ज्याअर्थी , सामाजिक परिणाम निर्धारण सारांश यासोबत जोडलेल्या अनुसूची चार मध्ये दिलेले आहे,

आणि ज्याअर्थी, कलम 43 च्या पोट कलम (1) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील, यासोबत जोडलेल्या अनुसूची पाचमध्ये दिलेला आहे. (नियुक्ती करणे आवश्यक असेल तर, या अनुसूचीमध्ये तपशील नमूद करावा);

त्याअर्थी आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम 11 च्या पोट कलम 4 अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमीनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भाग निर्माण करणार नाही :

परंतु उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिकाऱ्यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमून करुन अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल;

परंतु आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुध्दीपुरस्पर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्यांकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम 11 च्या पोट कलम (5) अनुसार, जिल्हाधिकारी भूमीसंपादन, पुनर्वसन व पुर्नसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, 2014 (यात यापुढे ज्यांचा निर्देश "उक्त नियम" असा करण्यात आला आहे) यांच्या नियम 10 च्या उप नियम (3) द्वारे विहित केल्याप्रमाणे भूमिअभिलेखाच्या अद्ययावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम 3 च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखाली जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी **उपजिल्हाधिकारी भूसंपादन क्र. 7 (मोहोळ) सोलापूर** यांना पदनिर्देशित करीत आहे.

D/Slao2014/Joshi/Notification /solapur

Scanned by CamScanner

## अनुसूची एक

प्रयोजन — पाझर तलाव क्र. 1 एस.आर. 24/2007
गावाचे नाव- हराळवाडी, तालुका-मोहोळ, जिल्हा-सोलापूर.

| अ.क्र. | संपादन करावयाच्या जागेचे | |
|---|---|---|
| | भूमापन किंवा गट क्रमांक | अंदाजि क्षेत्र (हेक्टर मध्ये) |
| 1. | 18 पै | 4 हे.74आर |

## अनुसूची — दोन

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नाव - पाझर तलाव क्र.1

प्रकल्पकार्याचे वर्णन — रोजगार हमी योजनेअंतर्गत पाझर तलाव क्र. 1

समाजाला मिळणारे लाभ — रोजगार हमी योजनेअंतर्गत झालेल्या पाझर तलावात पाण्याचे संचयन होते. शेतकऱ्यांना लाभ होतो. (आर्थिक, रोजगार, पायाभूत सूविधा, सोयीसूविधा याबाबत व इतर लाभासंबंधात)

## अनुसूची — तीन

बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे — निरंक आहे.

## अनुसूची — चार

(सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणाऱ्या अभिकरणाने दिलेला) सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश

निरंक आहे.

## अनुसूची — पाच

नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील

अ. प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्याचे पदनाम — उपजिल्हाधिकारी भूसंपादन क्र.7(मोहोळ) सोलापूर

ब. प्रशासनाच्या कार्यालयाचा पत्ता - जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सिध्देश्वर पेठ, सोलापूर -413001

क. ज्या अधिसूचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे त्या अधिसूचनेचा तपशील — मा. जिल्हाधिकारी (भूसंपादन समन्वय शाखा) सोलापूर यांचेकडील आदेश क्र.2019/भूसं/कार्या1/आरआर/2832 दि. 07/09/2019

टिप — उक्त जमिनीच्या आराखडयाचे उपजिल्हाधिकारी भूसंपादन क्र.7 (मोहोळ) सोलापूर, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सिध्देश्वर पेठ, सोलापूर -413001 यांच्या कार्यालयात कार्यालयीन कामाकाजाच्या वेळात पाहण्यासाठी उपलब्ध आहेत.

दिनांक : /10/2019
ठिकाण : सोलापूर.

राजेन्द्र भोसले (भा.प्र.से.)
जिल्हाधिकारी, सोलापूर

D/Slao2014/Joshi/Notification /solapur

Scanned by CamScanner